
**LOKMAT KOLHAPUR EDITION 14.09.2017**

# शाहू छत्रपतींना जनरल थिम्मय्या पुरस्कार

## प्रतिष्ठेचा पुरस्कार : १६ सप्टेंबर रोजी बंगलोरमध्ये वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बंगलोर येथील जनरल के. एस. थिम्मय्या मेमोरियल ट्रस्टचा अखिल भारतीय पातळीवरील प्रतिष्ठेचा गणला गेलेला 'जनरल थिम्मय्या पुरस्कार' कोल्हापूरच्या छत्रपती घराण्याचे वारसदार शाहू छत्रपती यांना जाहीर झाला. आदर्शभूत समाजसेवेचा गौरव म्हणून हा पुरस्कार शाहू छत्रपतींना शनिवारी (दि. १६) बंगलोर येथे समारंभपूर्वक बहाल केला जाणार आहे.



जनरल थिम्मय्या हे सन १९५७ ते १९६१ या काळात भारताचे सरसेनापती होते. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी एक लढाऊ सेनानी म्हणून ख्याती प्राप्त केली होती. विशेष म्हणजे बंगलोरच्या 'बिशप कॉटन बाईज स्कूल' या १५० वर्षे जुन्या नामवंत शिक्षण संस्थेचे ते विद्यार्थी होते. याच संस्थेतून व्हिक्टोरिया क्रॉस सन्मानित विल्यम रॉबिनसन, ग्रेट ब्रिटनचे सरसेनापती सर फ्रँक सिम्पसन, अॅडमिरल विजय शेखावत, जगप्रसिद्ध भारतीय अणुशास्त्रज्ञ डॉ. राजा रामण्णा अशा अनेक प्रसिद्ध व्यक्ती तेथे शिकल्या. शाहू महाराज यांचे शिक्षणही याच शिक्षण संस्थेत पूर्ण झाले.

बिशप कॉटन बाईज स्कूल या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन काही वर्षांपूर्वी 'जनरल थिम्मय्या मेमोरियल ट्रस्ट'ची स्थापना केली. या ट्रस्टतर्फे प्रत्येक वर्षी विविध क्षेत्रांत अखिल भारतीय पातळीवर आदर्शभूत कार्य करणाऱ्या व्यक्तीस जनरल थिम्मय्यांच्या नावे पदक दिले जाते. आतापर्यंत जनरल कपूर, अॅडमिरल वडगावकर, अॅडमिरल नायर, राजदूत खलिली आदींना या पुरस्काराने सन्मानित केले आहे. महाराष्ट्रातील ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी (पुणे) व छत्रपती शाहू विद्यालय (कोल्हापूर) आदी अनेक शैक्षणिक संस्थांचे शाहू छत्रपती अध्यक्ष व प्रमुख मार्गदर्शक आहेत. मुलींना सैनिकी शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी 'तारा कमांडो फोर्स' हे केंद्र सुरू केले आहे. देशाच्या सीमांवर तैनात असणाऱ्या मराठा बटालियनच्या भेटीस वारंवार जाऊन त्यांचे मनोधैर्य वाढविण्याच्या उपक्रम ते सातत्याने राबवत असतात. कुस्ती, फुटबॉल आदी क्रीडा प्रकारातील खेळाडूंना त्यांचे नेहमी प्रोत्साहन मिळत आले आहे.

# Maharashtra Times Kolhapur Edition 14.09.2017

# श्रीमंत शाहू छत्रपतींना जनरल थिमय्या पुरस्कार

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



बेंगळुरु येथील जनरल के. एस. थिम्मय्या मेमोरियल ट्रस्टचा अखिल भारतीय पातळीवरील 'जनरल थिम्मय्या पुरस्कार' कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांना जाहीर झाला आहे. शाहू छत्रपती महाराजांच्या आदर्श समाजसेवेचा गौरव म्हणून दिल्या जाणाऱ्या या पुरस्काराचे शनिवारी (ता. १६ सप्टेंबर) बेंगळुरू येथे समारंभपूर्वक वितरण होणार आहे. आतापर्यंत जनरल कपूर, अॅडमिरल वडगावकर, अॅडमिरल नायर, राजदूत खलिली यांना पुरस्काराने सन्मानित केले आहे.

जनरल थिमय्या हे १९५७ ते १९६१ या कालावधीत भारताचे सरसेनापती होते. त्यांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात लढाऊ सेनानी म्हणून ख्याती प्राप्त केली होती. ते बेंगळुरुच्या बिशप कॉटन बॉईज स्कूल या शिक्षण संस्थेचे विद्यार्थी होते. श्रीमंत शाहू महाराजांचेही शिक्षण याच संस्थेत झाले आहे. या संस्थेतील माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन जनरल थिम्मय्या मेमोरियल ट्रस्टची स्थापना केली आहे. दरवर्षी विविध क्षेत्रात अखिल भारतीय पातळीवर आदर्श कार्य करणाऱ्या व्यक्तीस या पुरस्काराने गौरवण्यात येते.

श्रीमंत शाहू छत्रपती महाराज हे ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी, छत्रपती शाहू विद्यालय अशा शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष व मार्गदर्शक आहेत. त्यांनी मुलींसाठी तारा कमांडो फोर्स केंद्र सुरू केले आहे. मराठा बटालियनच्या सीमेवर तैनात असलेल्या जवानांना भेटी देऊन मनोधैर्य वाढवण्याचा उपक्रम ते करत आहेत.

# PUDHARI KOLHAPUR EDITION 14.09.2017

# शाहू महाराज यांना ज. थिमय्या पुरस्कार



कोल्हापूर : प्रतिनिधी

बेंगलोरच्या बिशप कॉटन बॉईज स्कूल या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी स्थापन केलेल्या जनरल थिमय्या मेमोरियल ट्रस्टचा जनरल थिमय्या पुरस्कार शाहू महाराज यांना जाहीर झाला आहे. शनिवारी (दि. १६) बेंगलोर येथे समारंभपूर्वक हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

जनरल थिमय्या १९५७ ते ६१ या काळात भारताचे लष्करप्रमुख होते. बिशप कॉटन बॉईज स्कूलचे ते माजी विद्यार्थी होते. अखिल भारतीय स्तरावर आदर्शभूत कार्य करणाऱ्या व्यक्तीस त्यांच्या नावाने पुरस्कार दिला जातो. शाहू महाराजही बिशप कॉटन बॉईज स्कूलचे माजी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्रातील ऑल इंडिया शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी (पुणे) व छत्रपती शाहू विद्यालय (कोल्हापूर) या शैक्षणिक संस्थांचे शाहू महाराज अध्यक्ष आहेत. मुलींना सैनिकी शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी तारा कमांडो फोर्स स्थापन केले आहे. याबरोबरच कुस्ती, फुटबॉल या क्रीडा प्रकारांना त्यांनी प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या या समाजकार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार जाहीर झाला असल्याची माहिती पत्रकात दिली आहे.

# SAKAL KOLHAPUR EDITION 14.09.2017

# श्रीमंत शाहू छत्रपती महाराजांना 'जनरल थिम्मय्या' पुरस्कार जाहीर



कोल्हापूर, ता. १३ : राष्ट्रीयस्तरावर लौकिक असलेल्या बंगळूरच्या जनरल के. एस. थिम्मय्या मेमोरियल ट्रस्टतर्फे देण्यात येणारा 'जनरल थिम्मय्या' पुरस्कार यंदा श्रीमंत शाहू महाराज छत्रपती यांना जाहीर झाला. जनरल थिम्मय्या १९५७ ते १९६१ या काळात भारताचे सरसेनापती होते. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी लढाऊ सेनानी म्हणून लौकिक मिळवला. शनिवारी (ता. १६) बंगळूर येथे पुरस्काराचे वितरण होणार आहे.

बंगळूरच्या बिशप कॉटन बॉईज स्कूल या नामांकित शिक्षण संस्थेचे ते विद्यार्थी होते. संस्थेत व्हिक्टोरिया क्रॉस सन्मानित विल्यम रॉबिन्सन, ग्रेट ब्रिटनचे सरसेनापती सर फ्रॅंक सिम्पसन, ॲडमिरल विजय शेखावत, भारतीय अणुशास्त्रज्ञ डॉ. राजा रामण्णा अशा प्रसिद्ध व्यक्तींसह श्रीमंत शाहू महाराजांचेही शिक्षण झाले आहे.

श्रीमंत शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात येत आहे. श्रीमंत शाहू महाराज ऑल इंडिया शिवाजी मेमोरियल सोसायटी, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, शिवाजी मराठा एज्युकेशन, शाहू विद्यालय अशा विविध शैक्षणिक संस्थांवर कार्यरत आहेत. मुलींना सैनिकी शिक्षण मिळावे यासाठी 'तारा कमांडो फोर्स' स्थापन केला. सीमेवरील जवानांचे मनोबल वाढविण्याचे कार्यही त्यांनी केले आहे. कुस्ती, फुटबॉल आदी क्रीडा प्रकारांना ते प्रोत्साहन देतात. पूर्वजांचा इतिहास जतन व्हावा, त्यावर मूलगामी संशोधन व्हावे यासाठीही त्यांचा आग्रह असतो; तर सामाजिक न्यायासाठी अनेक आंदोलनात त्यांचा सहभाग होता, आदी कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

## TARUN BHARAT KOLHAPUR EDITION 14.09.2017

# श्रीमंत शाहू महाराज यांना 'जनरल थिमय्या' पुरस्कार

## बेंगळूर येथे शनिवारी होणार पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी
कोल्हापूर

बेंगळूरच्या जनरल के.एस.थिमय्या मेमोरियल ट्रस्टचा अखिल भारतीय पातळीवरील 'जनरल थिमय्या पुरस्कार' श्रीमंत शाहू महाराज यांना जाहीर झाला आहे. अशी माहिती नवीन राजवाडा कार्यालयाच्या वतीने पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

पत्रकात म्हटले आहे, जनरल थिमय्या हे सन १९५७ ते १९६१ या काळात भारताचे सरसेनापती होते. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात त्यांनी एक लढाऊ सेनानी म्हणून ख्याती प्राप्त केली होती. विशेष म्हणजे बेंगळूरच्या 'बिशप कॉटन बॉईज स्कूल' या १५० वर्षे जुन्या नामवंत शिक्षण संस्थेचे ते विद्यार्थी होते. याच संस्थेतून व्हिक्टोरिया क्रॉस सन्मानीत विल्यम



रॉबिनसन, ग्रेट ब्रिटनचे सरसेनापती सर फ्रँक सिम्पसन, ॲडमिरल विजय शेखावत, जगप्रसिध्द भारतीय अणुशास्त्रज्ञ डॉ.राजा रामण्णा आदी अनेक प्रसिध्द व्यक्तींनी शिक्षण घेतले आहे. श्री शाहू छत्रपती महाराज यांचेही शिक्षण याच संस्थेत झाले आहे.

महाराष्ट्रातील 'ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटी', 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी', 'शिवाजी मराठा एज्युकेशन सोसायटी' (पुणे) व 'छत्रपती शाहू विद्यालय' (कोल्हापूर) आदी अनेक शैक्षणिक संस्थांचे श्री शाहू छत्रपती महाराज अध्यक्ष व मार्गदर्शक आहेत. मुलींना सैनिकी शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी 'तारा कमांडो फोर्स' हे केंद्र सुरू केले आहे. याशिवाय देशाच्या खडतर सीमांवर तैनात असणाऱ्या मराठा बटालियनच्या भेटीस जाऊन त्यांचे मनोधैर्य वाढविण्याचा उपक्रम ते सातत्याने राबवत असतात. सेवानिवृत्त जवान व त्यांच्या विधवा पत्नी यांच्या कल्याण योजनातही ते सक्रिय सहभागी असतात.

कुस्ती, फुटबॉल आदी क्रीडा प्रकारातील खेळाडूंना त्यांचे नेहमीच प्रोत्साहन मिळत आले आहे. पूर्वजांचा इतिहास जतन व्हावा, त्यावर मूलगामी संशोधन व्हावे यासाठी ते प्रयत्नशील असतात. शिवछत्रपती व राजर्षी शाहू महाराज यांचे वारसदार या नात्याने सामाजिक न्यायासाठी झालेल्या अनेक आंदोलनात त्यांनी सहभाग नोंदविला आहे. या सर्व समाजकार्याचा गौरव म्हणून त्यांना जनरल थिमय्या पदकाचा सन्मान दिला जातो आहे, हे भूषणावह आहे.

### 'जनरल थिमय्या मेमोरियल ट्रस्ट'तर्फे पुरस्कार...

बिशप कॉटन बॉईज स्कूल या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन काही वर्षांपूर्वी 'जनरल थिमय्या मेमोरियल ट्रस्ट' ची स्थापना केली. या ट्रस्टतर्फे दरवर्षी विविध क्षेत्रात अखिल भारतीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस जनरल थिमय्यांच्या नावे पुरस्कार देण्यात येतो. आतापर्यंत जनरल कपूर, ॲडमिरल वडगावकर, ॲडमिरल नायर, राजदूत खलिली आदी नामवंतांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. यंदाचा पुरस्कार श्री शाहू छत्रपती महाराज यांना 'जनरल थिमय्या पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.